# ❖ अंतरंग ❖


| | | | |
|---|---|---|---|
| १. | निसर्ग प्रेम | -------- | २ |
| २. | संपादकीय | श्री. मा.ना. कदम | ३ |
| ३. | संस्थापकाचे स्वगत | श्री. मा.ना. कदम | ४ |
| ४. | शुभसंदेश | मा.श्री.विलासराव देशमुख | ५ |
| ५. | शुभसंदेश | मा.श्री.गणेश नाईक | ६ |
| ६. | शुभसंदेश | मा.श्री.बबनराव पाचपुते | ७ |
| ७. | शुभसंदेश | डॉ.शुभा राऊळ | ८ |
| ८. | शुभसंदेश | मा.श्री.नकुल पाटील | ९ |
| ९. | शुभसंदेश | मा.सौ.अंजनी प्रभाकर भोईर | १० |
| १०. | शुभसंदेश | मा.श्री.रामराव वाध | ११ |
| ११. | शुभसंदेश | मा.श्री.विजय नाहटा | १२ |
| १२. | नवी मुंबईचे अस्वास्थ्य | श्री. मा.ना. कदम | १३-१४ |
| १३. | पर्यावरणाची व्याप्ती | श्री. मा.ना. कदम | १४ |
| १४. | पेड (कविता) | श्री.कुंवर बैचेन | १५ |
| १५. | सानपाडयात हिरवळ आली | श्री.राम काजळोरकर | १५ |
| १६. | या ! जगाला काही देऊ या | श्री.राजेंद्र कुलकर्णी | १६ |
| १७. | मला एकदा जगायचंय (कविता) | श्री.आनंद कलबुर्गी | १७ |
| १८. | पर्यावरण (कविता) | श्री.धनराज चौधरी | १८ |
| १९. | पेड की महानता (कविता) | श्री. श्रीपाद पत्की | १८ |
| २०. | करोडपती क्लब.... | श्री.मधुकर गवारी | १९ |
| २१. | आधुनिक युगातील प्रगतीचा ... | श्री.मा.ना.कदम | २०-२१ |
| २२. | प्रदुषण झाले चोहीकडे (कविता) | श्री.हरेंद्र जाधव | २१ |
| २३. | वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी | श्री.ए.ए.वसईकर | २१ |
| 24. | Kid thoughts through Nature Drawing | Conducted by HLKSS | 22 |
| 25. | Global Warming.......... | Dr. K.C. Tripathi | 23 |
| 26. | What is Global Warming ? | Comp. by M.N.Kadam | 23 |
| 27. | Save the Environment (Poem) | Miss Shreeya Tippanwar | 24 |
| 28. | Save Energy, Save Environment | Comp.by M.N.Kadam | 24 |
| 29. | The Path of Victory | M.Biwas | 25 |
| 30. | Global Warming.......... | P.Susheel Kumar | 26 |
| 31. | What is Carbon Credit ? | Comp. by M.N.Kadam | 26 |
| 32. | What are Green House Gases ? | Comp. by M.N.Kadam | 26 |
| 33. | Pollution Control Tips | Comp. by M.N.Kadam | 27 |
| 34. | Have a Little Knowledge | Comp. by M.N.Kadam | 28 |

# हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा

# निसर्ग प्रेम

नोंदणी क्र. महा/३२७/२००५/ठाणे.

**स्थापना - ०१.०१.२००५**

संस्थापक : श्री.मा.ना.कदम

सल्लागार : श्री. रामनाथ जाधव, श्री. आबा रणनवरे
श्री. विजय मनियार, श्री. कुलदीपसिंग चावला,
सौ. शुभांगी कोकाटे

संपादक : श्री.मा.ना.कदम

सहसंपादक : श्री. एस्.जी.पत्की,
श्री. एम्.के. गवारी,
श्री. भावदास सी.एम.,

कार्यकारी संपादक : श्री. संजीव मेहरा, श्री. एस.के.शर्मा, श्री.के.सी. त्रिपाठी

मुखपृष्ठ : श्री.मा. ना. कदम

व्यवस्थापक : श्री. टी.वी.विन्सेंट जॉन,
श्री. चेतन गोराडीया

मार्गदर्शक : श्री. सुरेश मेनन, श्री. बाळासाहेब शिंत्रे, सौ. जयश्री पां. दंडवते,
श्री. बी.डी.असबे, श्री. पी.ए.सणस,
डॉ. रामचंद्र सांगळे

विशेष मार्गदर्शक : श्री. अभय मणियार, श्री. शेखर बा. म्हात्रे,
श्री. एम.के.मिश्रा,
श्री. व्ही.आर.कडू, श्री. अमरीश कुमार तिवारी,
श्री. अतुल दा. किरतावडे, श्री. व्ही.टी.दरेकर,
श्री. व्ही.श्रीधर, श्री. सुभाष कोकाटे, श्री.तारा पाटील

आशिर्वाद : संत श्री आसारामजी बापू

प्रकाशक : हरियाली लोक कल्याण सेवा समिती

~~मुद्रक~~ : अनुपम आर्टस्, अ-२३, ॲफको मार्केट, से. १*६, तुर्भे, नवी मुंबई


खाजगी वितरणासाठी

देणगी मुल्य रु. ३०/-



Plant More Trees, Save Nature, Nature is the Boon of Life

Saurabh Pahwa
III A, Ryan International



# आधुनिक युगातील प्रगतीचा सोपा मार्ग (वृक्षारोपणातून करोडपती)

मा. ना. कदम
संस्थापकीय अध्यक्ष

मी आपणास आमच्या संस्थेतर्फे एक योजना मागास गावासाठी पुढे ठेऊ इच्छितो. ही योजना प्रत्येक नागरीकाच्या सहभागातून राबविणे जरूरीचे आहे. ती योजना म्हणजे "वृक्षारोपणातून गावाला करोडपती" बनविणे.

झाडे लावा, झाडे जगवा व आर्थिक परिस्थिती सुधारा, इच्छा असेल तर मार्ग सापडतो. केलेले फुकट जात नाही, केल्या शिवाय होत नाही. केल्याने होत आहे रे, आधी केलेची पाहिजे. ऐक्य हेच बळ. सहकार्यातून उध्दार, मैत्रितून प्रेम व प्रेमातून आनंद,आनंदातून आरोग्य निर्मिती, हे आपणास माहित आहेच. परंतु आजकाल याचा अंमल कमी प्रमाणात होत आहे. त्यामुळे आपण प्रगतीकडे न जाता अधोगतिकडे जात आहोत. एकीकडे आपणास दिसते की मानवाने खूप प्रगती केली. हा विज्ञानाचा चमत्कार आहे. मानवाच्या अचाट बुध्दिचा परिणाम आहे. परंतु या बुध्दिमान माणसाच्या हे कधी लक्षात येणार की आपण विनाशाकडे जात आहोत. मानवाच्या प्रत्येक क्षेत्रातील अतिक्रमणामुळे आपण पृथ्वीचा नाश करत आहोत. आपण आपलाच विनाश करत आहोत. आपल्या पुढील पिढ्यांचे संरक्षण करावयाचे असेल तर निसर्गाचे संवर्धन करणे जरूरीचे आहे. मानवाने नैसर्गिक संपत्तीचा नाश केल्यामुळे खालील गहन प्रश्न निर्माण झाले आहेत. पर्यावरण असंतुलन, पाण्याची जमिनीतील पातळी खालावणे, सामाजिक आरोग्याचा प्रश्न, निसर्ग सौंदर्याचा अभाव, रोजगाराचा प्रश्न, मानसिक शांतीचा अभाव व आर्थिक विषमता ईत्यादी.

यावर मी एक संस्थेतर्फे संकल्पना पुढे मांडत आहे. ही योजना सुरवातीला ग्रामीण भागात ग्रामसेवक यांचे माध्यमातून राबविण्याची ही कल्पना आहे. ही योजना कशी राबवावी.


मिळेल त्या जागेत योग्य सल्ल्याने मिश्र वृक्षारोपण करणे (किमती वृक्ष). त्याचे संवर्धन करणे, यासाठी गावातील प्रत्येक नागरीकाने वृक्षतोड करावयाची नाही व इतरांना वृक्ष तोडू द्यावयाचे नाहीत. जनावरे वृक्षारोपण केलेल्या भागात सोडायची नाही व इतरांना सोडू द्यावयाचे नाही. गावामध्ये चारी दिशेला लक्ष ठेवण्यासाठी चार वृक्ष दक्षता समित्याची स्थापना करावयाची. वृक्षारोपण भागात आग लागल्यास ती गावकऱ्यांनी सामुहिकरित्या विझवायची. वृक्षतोड केलेल्या माणसाची बातमी देणाऱ्यास बक्षिसे / पारितोषिक देण्याची योजना असावी. वृक्षतोडीचा गुन्हा करणाऱ्यास योग्य ती शिक्षा गावातील समितीनी सामुहिकरित्या करायची. यासाठी महिलांचा सहभाग घ्यायचा. या कामी वन विभाग महाराष्ट्र शासन आर्थिक मदतही करु शकेल.

या संकल्पनेचे फायदेही फार चांगले आहेत. वृक्ष तयार झाल्यावर विकून गावाला आर्थिक उत्पन्न

मिळू शकेल. जंगलसंपत्तीवर आधारीत कुटीरोद्योग करता येईल. जमिनीतील पाण्याची पातळी वाढून विहीरींना व बोअरवेलना पाणी वाढेल. रोजगार निर्मिती होईल. जमिनीची धूप होणार नाही व जमिन नापिक होणेपासून प्रतिबंध बसेल. निसर्ग सौंदर्य वाढेल. गाव स्वयंपूर्ण होईल. खत निर्मितीचा प्रकल्प राबविता येईल. पर्यावरण संतुलन राखले जाईल. हवेतील तापमान कमी होईल व सूर्यापासून निघणाऱ्या घातक किरणाचे शोषण होईल. प्राणवायु विरहित घातक पट्टे निर्माण होणार नाहीत. पाऊस वेळेवर येऊन योग्य प्रमाणात बरसेल. सामाजिक आरोग्यामध्ये सुधारणा होईल. स्वच्छतेकडे नागरिक आपोआप लक्ष देतील. मानसिक शांतता व आनंद मिळेल. सहकार्याची भावना वाढेल.

यासाठी गावातील प्रत्येक नागरीकाने आठवड्यातून सामाजिक बांधिलकेच्या भावनेतून श्रमदान करणे. योग्य दिशेने व सहकार्याने ही योजना राबविल्यास नक्कीच गाव दहा वर्षात करोडपती होईल व गावच्या प्रगतीसाठी उत्पन्नाचा मार्ग खुला राहील.

चला उठा सुरवात करू या! गावांना पुढे आणूया!



## प्रदुषण झाले चोहिकडे

या इकडे आणि त्या तिकडे<br>
प्रदूषण झाले चोहिकडे ।। धृ।।<br>
झाडे लावू धरती नटवू<br>
दुषित कचरा नाले हटवू<br>
दुषित ज्याने जीवन घडे ।। १ ।।<br>
निसर्ग जगवितो आपणाला<br>
आळा घालितो प्रदुषणाला<br>
निसर्ग मानवासाठी लढे ।। २ ।।<br>
उघड्या बोडक्या डोंगर रांगा<br>
समुद्र आटले दुषित गंगा<br>
निर्मलतेला जाती तडे ।। ३ ।।<br>
पंचमहा भूतास तगु द्या<br>
सर्व व्यापी जगास जगु द्या<br>
हरियालीला जे नित्य नडे ।। ४ ।।

## वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ......


निसर्ग शिक्षा देत नाही. निसर्गाविरूध्द जाल तर त्याचे परिणाम भोगायला लागतील. निसर्ग कोणालाही नाही म्हणत नाही, पण निसर्ग नियम सांगतो. तुम्हाला हवे असेल तेवढेच माझ्या कडुन घ्या, उरलेले दुसऱ्याला मिळु द्या. पण तुम्ही काय घ्याल याचाही विचार करा. म्हणजे नैसर्गिक संतुलन साधेल व त्यात भर पडेल. उद्याचा विचार करा आणि ठरवा परिणाम त्याचे आणि भविष्य पुढच्या पिढीचे. हिरवळ जगवा म्हणजे मन देखील हिरवे (तरूण) राहील. अन्यथा वाळवंट (वृध्दत्व) आहेच नशिबी. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ....

श्री. ए. ए. वसईकर

# संस्थापकाचे स्व:गत

मा. ना. कदम
संस्थापकीय अध्यक्ष

पृथ्वी एक आहे व ती आपल्या गरजा भागविण्यास समर्थ आहे. परंतु अति हव्यासामुळे मानवाला वाटते की, ही पृथ्वी आपली आहे, त्यावर कुणाचाही हक्क नाही. अक्षरश: अतिक्रमण चालले आहे. मी असे म्हणेन की, "मानवप्राणी स्वार्थी नाही व धुर्तही नाही." तो जर स्वार्थी किंवा धुर्त असता तर या एकमेव पृथ्वीचे, निसर्गाचे संरक्षण करण्यासाठी व काळजी घेण्यासाठी प्रयत्नशिल राहिला असता. परंतु, नाही. तो भूतकाळाचा दाखला न घेता व भविष्यातील आपल्या पिढ्यांचा विचार न करता झपाटलेल्या प्राण्यासारखा वर्तमानकाळात वागू लागला आहे. त्यामुळेच या मानवाने पैशासाठी किती तरी प्राण्यांची कत्तल केली, पक्ष्यांच्या जाती नष्ट केल्या, झाडांची, जंगलाची वाट लावली, नद्या प्रदुषित केल्या. यातुनच अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यातील महत्वाचा प्रश्न म्हणजे "पर्यावरण संतुलन." पर्यावरण संतुलन आणि



मानव याचा फारच जवळचा संबंध आहे. पर्यावरण जर आजारी झाले तर मानव कसा निरोगी राहील? तोही आजारीच आहे. म्हणूनच तो थकतो. त्याची कार्यक्षमता कमी झाली. रोगप्रतिबंधक शक्ति कमी झाली व त्यामुळेच आपण वैद्यकिय क्षेत्रांची उंची वाढवली, परंतु याला मर्यादा आहेत. एक दिवस असा येईल की वैद्यकिय क्षेत्रही अपुरे पडेल. निरोगी पर्यावरणाचे घटक, हवेचे घटक, शुध्द पाण्याचा दर्जा कसा असावा हे ठरलेले आहे. ज्याप्रमाणे निरोगी माणसाचे शरीराचे तपमान, साखर पातळी, हिमोग्लोबीन पातळी इ. याचे प्रमाण ठरलेले आहे. यामध्ये फरक पडला की आपण आजारी होतो. परंतु याला कारणीभूत आहे ते आपण निर्माण करत असलेली प्रदुषके व परिसराच्या स्वच्छतेचा अभाव, जंगलांचा नाश म्हणजेच निसर्गाचा नाश अर्थात आपलाच नाश हे ज्यावेळी मानवाला समजेल तेव्हाच या मानव जातीचे भले होईल. आपले कपडे, घर स्वच्छ असून चालत नाही तर परिसर स्वच्छ असावा लागतो. कारण हवा आपल्या परिसरातून मिळत असते. ती घरी तयार होत नसते. हे काय सूज्ञ माणसाला सांगायला हवे! पर्यावरण एका दिवसात बिघडत नाही व एका दिवसात सुधारता येत नाही. याची जाण ठेवून प्रत्येक मानवाने एक झाड वाढवण्याचे ठरवले, तर यामध्ये मानवजीतीचे कल्याण आहे. जर आपण जंगली प्राणी व पक्षी यापेक्षा वेगळे आहोत हे जर जगाला पटवून द्यायचे असेल तर झाडाला देव माना कारण एक सर्व साधारण झाड हे सर्व साधारण माणसापेक्षा श्रेष्ठ आहे. नाही तर "आया, खाया, पिया दो बच्चे पैदा किया और गया" हे तर इतर प्राणी पण करतातच की! प्राण्यामध्ये व आपल्यामध्ये फरक आहे, याची जाण ठेवली, स्वच्छता व निसर्ग संरक्षणाची आण घेतली, तर फार मोठी भक्ति झाली असे होईल. **क्रि इंडियन जमाती मध्ये एक म्हण आहे, "शेवटचे झाड तोडून टाकले, शेवटची नदी घाण केली, शेवटचा मासा गळाला लागला" त्यावेळी मानव प्राण्याला कळेल की, माणूस हा पैसे खावून जगत नसतो, तर त्याला निसर्ग जगवत असतो. याचे** भान ठेवणे आवश्यक आहे. यातच भावी पिढ्यांचे अस्थित्व व मानवजातीचे कल्याण अवलंबून आहे.



# या! जगाला काही देऊया !!

राजेंद्र चंद्रकांत कुलकर्णी
जुईनगर

माणसाचं आयुष्य किती धावपळीच असतं नाही? प्रत्येक जण घड्याळाच्या काट्यावर घावत असतो. गरीब असो वा श्रीमंत प्रत्येक जण आपआपले अस्तित्व टिकवण्यासाठी लढत आहे. झगडत आहे. माणसाला लढण्यासाठी-झगडण्यासाठी दोन हात आहेत, पाय आहेत, पण निसर्गाचे काय? मुका बिचारा "निसर्ग" हा निमुटपणे मानवी अत्याचार सहन करीत आहे. आपण पेपरमध्ये वाचतो, बातम्यांमध्ये पहातो, आज कितीतरी प्रकारचे प्राणी, पक्षी, झाडे नामशेष झाली आहेत. तर काही नामशेष होण्याच्या वाटेवर आहेत. 'आज निसर्गाचे अस्तित्वच धोक्यात आले आहे' असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती ठरणार नाही.

जगातील प्रत्येकाला स्वत:ची काळजी असते. परंतु काही माणसे अशी असतात की जे दुसऱ्यांचा सुध्दा विचार करतात. सामाजिक कामे करतात. समाज म्हणजे आपल्या अवती-भवती वावरत असलेली माणसे, आपले शेजारी-पाजारी, आपले नातेवाईक, आपला मित्र परिवार, जातीबांधव, शहरवासीय, देशवासीय व सर्वात शेवटी हे सारे जग. सारी मानवजात व सारा निसर्ग, समाजाची संकल्पना ह्या अशा चढत्या क्रमाने वृध्दींगत होत जाणारी आहे.

जगातील काही माणसे या जगाचा विचार करणारी असतात. जगाच्या विकासासाठी झटणारी असतात. कुणी मेघा पाटकर गरीबांच्या हक्कासाठी लढते. कुणी अण्णा हजारे भ्रष्टाचारा विरूध्द रान उठवितात. कुणी बाबा आमटे, डॉ. अभय व राणी बंग जंगलात राहून आदिवासींच्या विकासासाठी कार्यरत असतात. कुणी इंजिनीयर असतो, तर कुणी शास्त्रज्ञ. संपुर्ण जगात अशी बरीचशी माणसे कार्यरत आहेत की ज्यांच्यामुळे या जगाचा गाडा व्यवस्थित चालला आहे.

या लोकांइतकं मोठेपण आपल्या अंगात नाही. परंतु आपणही समाजासाठी काहीतरी करू शकतो. एक झाड हवेतील प्राणघातक वायु शोषून घेईल. हवेत प्राणवायुचे उत्सर्जन करील. लोकांना सावली देईल. लहान मुले झाडाच्या सावलीत बागडतील तर म्हातारी बाया-बापडे झाडाच्या सावलीत गप्पांचे फड रंगवतील.

असे म्हणतात की माणूस रिकाम्या हाताने जन्माला येतो व रिकाम्या हातानेच जगाचा निरोप घेतो. परंतु जगाचा निरोप घेण्यापूर्वी आपण जगाला काहीतरी देवून जाऊ या. झाडे. होय झाडे लावू या. जी वर्षानुवर्षे लोकांना आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत राहील.



# करोडपती क्लब मध्ये तुमचे स्वागत असो !!

मधुकर कृष्णा गवारी
जुईनगर.

गरीब असो वा श्रीमंत. प्रत्येकालाच हवा आहे पैसा, गरीबाला आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी हवा आहे पैसा, मध्यमवर्गीयाला आपल्या भविष्याच्या सुरक्षेसाठी हवा आहे पैसा, श्रीमंताला अधिक श्रीमंत होण्यासाठी हवा आहे पैसा, याचाच अर्थ इथे प्रत्येकालाच हवा आहे पैसा व प्रत्येकालाच व्हायचे आहे श्रीमंत.

जगातील बहुतेक माणसे हाच विचार करतात व तो बरोबरही आहे. पैसा कमावणे हा काही गुन्हा नाही. आपली आर्थिक स्थिती बळकट करणे म्हणजेच स्वत:चा विकास करणे. परंतु जगामध्ये अशीही काही माणसे आहेत की जी स्वत:च्या विकासाबरोबर समाजाच्या व देशाच्या विकासाचाही विचार करतात. मला वाटतं मी सुध्दा अशाच माणसांपैकी एक आहे.

२००३ साली माझे वडील अत्यवस्थ होते व त्यांना हॉस्पीटलमध्ये "ऑक्सीजन" सप्लायरवर ठेवण्यात आले होते. ऑक्सिजनची मानवी आयुष्यातील खरी किंमत मला तेव्हा कळली. जगातील प्राणवायू निर्मितीचे एकमेव स्तोत्र म्हणजे झाड. मी झाडे लावण्याचा व वृक्षसंवर्धनाचा निर्णय घेतला. कालांतराने माझी ओळख श्री. कदम साहेबांशी झाली.

आज जुईनगरमध्ये, माझ्या सोसायटीच्या आवारात तसेच रस्त्याच्या कडेने मी स्वत: माझ्या इतर सहकाऱ्यांच्या मदतीने, (श्री. कुलकर्णी, श्री. पाटील, ॐ श्री अष्टविनायक तरूण विकास मंडळ) तसेच श्री. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली, हरियाली लोक कल्याण सेवा समितीच्या माध्यमातून जवळ-जवळ २०० झाडांची लागवड केली असून त्यांचे संवर्धनही करीत आहे. श्री. कदम साहेबांनी मला वृक्ष समाजाला देत असलेल्या आर्थिक योगदानाबद्दल कल्पना दिली. ही माहिती जगातील नामवंत शास्त्रज्ञांनी संशोधन करून सिध्द केलेली आहे. एक झाड ५० वर्षामध्ये समाजाला ६४ लाख इतक्या रूपयांच योगदान वेगवेगळ्या मार्गाने देते.

याचाच अर्थ आज मी व माझ्या सहकाऱ्यांनी करोडो रूपये उत्पन्नाची रोपटी लावली आहेत. त्यापासून आम्हाला प्रत्यक्षरीत्या पैसे मिळणार नसले तरीही आम्ही मात्र समाजाला वृक्षांच्या रुपाने करोडो रूपयांचे योगदान दिले आहे. आणखी योगदान ही देणार आहोत. आम्ही करोडपती आहोत. आम्ही श्रीमंत आहोत व आम्ही आमची संपत्ती वाढविणार आहोत.

........... काय? .......... काय म्हणालात तुम्ही? श्रीमंत व्हायचे आहे? अहो, या की मग. तुमचेही आमच्या करोडपती क्लब मध्ये स्वागत आहे. तुम्हीही एक झाड लावा व लखपती व्हा. अनेक झाडे लावा व करोडपती व्हा. हीच मानव विकासाची व अस्तित्वाची गुरूकिल्ली आहे.

# पेड

सूरज की गर्मी सह-सहकर, पीकर ठंडा पानी पेड़
खुद की मुश्किल बन जाते हैं, औरों की आसानी पेड़

अपने आसन पर ही रहकर, औरों को फल देते हैं
ऋषियों - जैसी आदत वाले, हैं यह औढरदानी पेड़

इक दिन जाते - जाते मुझको आँधी ने यह समझाया
लचकीले जीवीत रहते हैं गिरते है अभिमानी पेड़

बारीश की बौछारें हों या गर्मी का तपता मौसम
बेघर लोगों को बनते हैं अक्सर छप्पर - छानी पेड़

कितने - कितने रुपों में वो हमको छाया देते हैं
बनकर अम्मा-बापू, दादा-दादी, नाना-नानी पेड़

इसको सर पर बिठलाया तो उसको धरती पर पटका
बच्चों के संग बच्चे बनकर, करते हैं शैतानी पेड़

ये आए तो पत्थर मारे, वो आए तो फलतोड़े
बस यों ही सहते रहते हैं औरों की मनमानी पेड़

कितने ही गौतमबुध्दों को इनसे अनुपम ज्ञान मिला
बरगद जैसे, पीपल जैसे, कैसे-कैसे ज्ञानी पेड़

तपती लू में थक कर राही हम तक ही तो आते हैं
पूछों हमसे, हम सब क्या हैं, हम हैं रेगिस्तानी पेड़

इस दुनिया को मानवता का हमने पाठ पढ़ाया है
देखो हमको यूँ मत काटो, हम इन्साँ है, यानी पेड़

डा. कुँवर बेचैंन
सौजन्य : **मोक्षदा,** पर्यावरण एवमं वन सुरक्षा समिती,

# सानपाड्यात हिरवळ आली

बघा कशी ही किमया झाली
सानपाड्यात हिरवळ आली ।। धृ ।।

रस्ता काठाला नव्हतं पाड
फूटा फूटावं दिसत्यात झाडं
रस्ता रस्त्यात सावली झाली
सानपाड्यात हिरवळ आली ।। १ ।।


लोक उठत्यात भल्या पहाटं
हाती वाहती पाण्याचं पाट
सारी जमीन ही केली ओली
सानपाड्यात हिरवळ आली ।। २ ।।

कामी आल्या किती अडचणी
साऱ्या साऱ्यांना पाजून पाणी
हरियाली सेवानं धमाल केली
सानपाड्यात हिरवळ आली ।। ३ ।।

कदम सायबांनी कमाल केली
साथीदारांनी साथ त्यांना दिली
हरियाली सेवा ही जन्माला आली
सानपाड्यात हिरवळ आली



- श्री राम काजरोळकर,
लोक कलाकार



# मला एकदा जगायचय

-श्री. आनंद योगीराज सा. कलबुर्गी

मला एकदा जगायचं आहे फुल होऊन
कसं बनवतात रंग एवढे मातीतल्या पाण्यातून ?
फुलांमुळं माणसं झाडांना डिवचतात
तरीही झाडं फळं फुलं न थांबता का बरं देतात ?
कोणाची बरं ते आज्ञा पाळतात ?
मला एकदा जगायचं आहे फुल होऊन

मला एकदा जगायचं आहे सागर होऊन
कसं बरं एवढं पाणी एकत्र ठेवतं ?
साऱ्या जगाची घाण पोटात घेतं
तरी कधी का ते कुरकुरतं ?
उन्हानं तापायचं वाफ होवून वर जावून
पावसाच्या रुपानं धरणीवर प्रेम वर्षाव करायचं
धरणी स्वच्छ करुन चैतन्याची हिरवळ पसरायचं
मला एकदा जगायचं आहे सागर होऊन


मला एकदा जगायचं आहे सुर्य होऊन
कशी बरं एवढी आग पोटात ठेवतो
ग्रहांना सुध्दा स्वत:भोवती फिरत ठेवतो
त्याकडं किती प्रकाश अन् उष्णता आहे ते मोजता येतं
?
आणि एवढं असून कधी का तो भाव खातो ?
त्याचं काम तो नित्यपणे करत असतो
मला एकदा जगायचं आहे सुर्य होऊन

मला एकदा जगायचं आहे पक्षी होवून
कसं बरं आकाशात भरारा फिरत असतात
झाडांवर घरटं बांधायचं पण सारखं बाहेरच
रहायचं
मैलन् मैल प्रवास करून परदेश सुध्दा पाहून
यायचं
सीमा नसलेल्या जगात रहायचं
प्रेमाचा संदेश देत हे विश्वची माझे घर म्हणायचं
मला एकदा जगायचं आहे पक्षी होऊन

मला एकदा जगायचं आहे सिंह होऊन
राजा कसा असतो पहायचं आहे सिंह होऊन
डरकाळीला त्याच्या एवढं महत्व कसं असतं
स्वावलंबी शेवटपर्यंत कसा असतो
जगायचं आहे मला राजा होऊन
मला एकदा जगायचं आहे सिंह होऊन

मला एकदा जगायचं आहे आनंद होऊन
का बरं आवडतो सर्वांनाच आनंद ?
आनंद सर्वांना थोडा थोडाच का मिळतो ?
तो कायमचा मुक्कामाला का थांबत नसतो ?
आनंदाच्या मनात दडलय काय हेच एकदा
पहायचं हाय
मला एकदा जगायचंआहे आनंद होऊन

मला नाही जगायचं कधी माणूस होऊन
सतत साठवण्यासाठी जगायचं,
साठवता साठवताच मरायचं
दुसऱ्याला चेपवून स्वत: मोठं व्हायचं
घाणेरडं जगून सुध्दा पांढऱ्या पोषाखात रहायचं
मला नाही जगायचं कधी माणूस होऊन.



# पर्यावरण !

श्री. धनराज चौधरी
सौजन्य : बाल विकास चॅरिटेबल ट्रस्ट, नेरुळ

हमारा अपना है ये नगर,
इसे बनावें हम सुन्दर ।
अपना परिसर रक्खें साफ,
स्वच्छ नगर होगा अपने आप ।

सब घर द्वार और मैदान,
रहें स्वच्छ सब एक समान ।
कूडा कचरा व्यवस्थित डालें,
रोगों के कीटाणु न पालें ।

कूडा कर्कट व्यर्थ न जान,
इसमें हे उर्जा महान ।
एको उर्जा इससे पाओ,
दूजी उपजाऊ खाद बनाओ ।

कृत्रिम खाद महंगा अधिकतर,
उससे बचें कम्पोष्ट बनाकर ।
जब हर घर यह लेगा ठान.
सफल समझलो यह अभियान ।

इसके लिए हम लें संकल्प,
और नहीं है कोई विकल्प ।
स्वयं प्रस्तुत करें दृष्टांत,
जिससे इसका न हो अन्त ।

अपने घर या घर के पास,
जहाँ सुलभ हो करें प्रयास ।
रोपें हर वर्ष एक एक पौधा,
मनावें जन्म दिन ऐसा बहुधा ।

पालें पोसें उसे बढ़ावें,
कोई उसे न क्षति पहुंचावे ।
जितना हम रखेंगे ख्याल
उतने होंगे मालामाल।
वेद शास्त्र सभी यह कहते,
वृक्ष बच्चों से बढ़कर होते ।
दस दस बच्चों के समान,
हर पौधे का पुण्य महान ।

इन्हें पालकर सुख पाओ,
नष्ट इन्हें कर दुःख न बढाओ,
जब यह चल पडेंगा उन्मुक्त ।
पितृ ऋण से होंगे मुक्त ।

हम जन्म से मरण तक,
नाना विधि फैलाते प्रदुषण ।
वृक्ष हमारी करते रक्षा,
पीकर जहर देते ऑक्सीजन ।

पेड़ तने पत्ते फल फूल,
सभी उपयोगी इसे न भूल।
जीवन भर वे खुशी बाँटते,
मरने पर भी उपयोगी रहते ।

जितने लदे रहते है फलसे,
उतने अधिक वे है नवते ।
विनम्रता की शिक्षा पावे,
जीवन अपना सफल बनावे ।

वृक्षों की रक्षा धर्म हमारा,
लगे सदैव अपनों से प्यारा ।
समस्त विश्व में फैले यह नारा,
जिससे सार्थक हो जन्म हमारा ।

आओ करें तुलना मानव से,
कौन बड़ा लगता है किससे ।
सभी कहेंगे वृक्ष महान,
त्यागमय जीवन देता वरदान ।



# पेड की महानता

पेड है हमारी जान
पेड है दस बच्चे समान ।
मित्रता पेड से करो
जीवन खुशियों से भरो ।।

पानी और वायु की मदत से
बिजली का निर्माण हो तेजी से ।
कोयले का प्रयोग बंद हो
पर्यावरण हरगिज दूषीत न हो ।।

पेड में है औषधी गुण
रोगों के लिये है रामबाण ।
प्राणवायु का प्रमाण बढेगा
प्यासी धरती पर पानी लायेगा ।।

हर रास्ता होगा मस्त
रहेगा कचरा मुक्त ।
गर प्लास्टिक थैली न होगी
तो रोगों से छुट्टी मिलेगी ।।

बुजुर्ग आयेंगे धुमने
भुलने बीते गमों को ।
तरुणता उनमें छायगी
जीने की चाह बढेगे ।।

कवि : श्री.ग.पत्की



मंत्री
राज्य उत्पादन शुल्क,
पर्यावरण व कामगार
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २३/१०/२००७

# शुभ संदेश

हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा, नवी मुंबई ही संस्था गेल्या सुमारे ८ वर्षापासून वृक्षारोपणाच्या माध्यमातून शांतता, पर्यावरण संतुलन, सामाजिक आरोग्य, रोजगार निर्मिती व स्वच्छतेतून समृध्दी ही उदिष्ठे साध्य करीत आहे हे वाचून आनंद वाटला. संस्थेच्या '**निसर्गप्रेम**' या स्मरणिकेत विविध मान्यवरांचे लेख हे पर्यावरण्याच्या व वृक्षरोपणाच्या दृष्टीने निश्चितच मार्गदर्शक व वैविध्यपूर्ण असेच आहेत. त्यातील संस्थापकांचे मनोगत तर अभ्यासपूर्ण विचारांचे द्योतक आहे. स्मरणिकेचे मुखपृष्ट व अंतर्गत विविध चित्रसंग्रह मनोवेधक ध्येय धोरणाशी व निसर्गाशी सुसंगतच आहेत.

सानपाडा सेक्टर-२ येथे गेल्या ८ वर्षात ५००० रोपांची लागवड, नापीक व पडीक जमिनीमध्ये हरितपट्टा निर्मिती या अंगीभूत धोरणांबरोबरच शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे इ. मध्ये पर्यावरण संरक्षण, संस्कार, योगदर्शन, आयुर्वेद इ. विषयांची व्याख्याने आयोजित करून आपण समाज प्रबोधनाचेच कार्य करीत आहात त्याबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. कदम व इतर पदाधिकारी निश्चितच कौतुकास पात्र ठरतात.

पर्यावरण संतुलन ही आज काळाची गरज आहे हे ओळखून आपली संस्था विविध धोरणे आखून त्याची अंमलबजावणी करीत आहे. त्यासाठी **निसर्गप्रेम** ही निसर्गाशी साधर्म्य दाखविणारी स्मरणिका यावर्षीही प्रसिध्द करीत अहात त्याबद्दल धन्यवाद. ही स्मरणिका यापेक्षाही मनोवेधक व अभ्यासपूर्ण होईल असा विश्वास वाटतो.

आपल्या निसर्गप्रेम स्मरणिकेस व आपल्या सर्व कार्यक्रमांस माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा.!

प्रति :- मा. श्री. मा. ना. कदम साहेब,
संस्थापकीय अध्यक्ष,
हरियाली लोक सेवा समिती, सानपाडा.

**गणेश नाईक**
**पालकमंत्री, ठाणे जिल्हा.**



# अंजनी प्रभाकर भोईर
महापौर
नवी मुंबई महानगरमालिका

## शुभ संदेश

दि. १९-१२-२००७

नवी मुंबई परिसर हरितमय व्हावे व पर्यावरणाचे संतुलन राखले जावे या दृष्टीकोनातुन हरियाली लोक कल्याण सेवा समिती मार्फत गेली अनेक वर्षे विविध ठिकाणी वृक्ष लागवड होत आहे. विशेष बाब म्हणजे श्रमदान करुन सानपाडा परिसर हरितमय करण्याचा चांगला संकल्प आपण राबविला आहे. पर्यावरणाशी बांधिलकी जपत असताना आपल्या संस्थेकडुन सामाजिक कार्य व्हावे या उद्देशाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी पर्यावरण संतुलन, संस्कार, योगदर्शन, आयुर्वेदा दर्शन आदि विषयांवर मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करुन एक आदर्श युवापिढी निर्माण करणेचा प्रयत्न आपले मार्फत होत आहे.


पर्यावरणाची घडी बिघडली तर सृष्टी नष्ट होईल. तेव्हा पर्यावरणाचे रक्षण म्हणजेच आपले संरक्षण. या तत्वाने आपण पर्यावरण संवर्धन करणे व त्याचे महत्व जनमानसात प्रसारीत करणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने हरियाली लोक कल्याण सेवा समिती तर्फे 'निसर्गप्रेम' ही स्मरणिका गेल्या वर्षीपासुन प्रकाशित होत आहे. मागील स्मरणिकेप्रमाणे ही स्मरणिका देखील पर्यावरण प्रेमींसाठी मार्गदर्शक ठरेल.

हरियाली लोक कल्याण सेवा समितीच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त व निसर्गप्रेम च्या दुसऱ्या आवृत्तीस माझ्याकडुन आपणांस हार्दिक शुभेच्छा !

आपली स्नेहांकीत,

प्रति :- मा. श्री. मा. ना. कदम साहेब,
संस्थापकीय अध्यक्ष,
हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा.

(अंजनी प्रभाकर भोईर)



विजय नाहटा
महापालिका आयुक्त
नवी मुंबई महानगरमालिका

दि. २०-१२-२००७

# शुभ संदेश

नवी मुंबईतील सानपाडा येथे हरियाली लोक कल्याण सेवा समिती ही गेल्या आठ वर्षांपासून वृक्षरोपणाच्या माध्यमातून पर्यावरण संतुलन, सामाजिक आरोग्य, रोजगार निर्मिती व श्रमदानातून स्वच्छता राखण्यासाठी कार्यरत आहे. ही बाब प्रशंसनिय आहे. या संस्थेव्दारे विविध कार्यक्रम राबवून जनजागृतीचे कार्य सतत होत आहे. संस्थेच्या निसर्गप्रेम या स्मरणिकेत विविध मान्यवरांचे लेख, पर्यावरण संतुलन व वृक्षरोपणाचे दृष्टिने मार्गदर्शक व विविधतापूर्ण आहेत.

आपल्या संस्थेने सानपाडा सेक्टर २ येथे गेल्या ८ वर्षांत ५००० रोपांची लागवड, पडीक जमिनीमध्ये हरितपट्टा निर्मिती या अंगीभूत उद्दिष्टांबरोबरच शाळा, महाविद्यालये, इ. मध्ये पर्यावरण संरक्षण, योग संस्कार, आयुर्वेद इ. विषयांची व्याख्यानांचे आयोजन करून समाज प्रबोधनाचे जे कार्य करीत आहात त्याबद्दल संस्थेचे संस्थापकीय अध्यक्ष श्री. मा. ना. कदम तसेच सर्व सभासद यांचे अभिनंदन.

निसर्गप्रेम ही निसर्गाशी जवळीक साधणारी स्मरणिका यावर्षीही प्रसिध्द करीत आहात ती मनोवेधक व अभ्यासपूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

आपल्या **निसर्गप्रेम** स्मरणिकेस माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**(विजय नाहटा)**

**महानगरपालिका आयुक्त.**

प्रति :- मा. श्री. मा. ना. कदम साहेब,
संस्थापकीय अध्यक्ष,
हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा.




डॉ. (सौ.)शुभा उमेश राऊळ

महानगरपालिका सभागृह

महानगरपालिका मार्ग, सी.एस.टी., मुंबई-४०० ००१.

दूरध्वनी कार्यालय : २२६२ ०४७० / २२६२ १०२०

फॅक्स : २२६९ ६७६९


दि. २४-१२-२००७

# शुभ संदेश

हरियाली लोक कल्याण सेवा समिती सानपाडा, नवी मुंबई ही संस्था दिनांक ६ जानेवारी २००८ रोजी आपला तिसरा वर्धापनदिन साजरा करीत असून त्या निमित्ताने स्मरणिका प्रकाशित करीत असल्याने वाचून अत्यंत आनंद झाला.

वृक्ष हा केंद्रबिंदू मानून संपूर्ण महाराष्ट्रभर श्रमदानातून वृक्षरोपणासारखे विविध कार्यक्रम हाती घेऊन पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महान कार्य संस्था करीत आहे. संस्थेने आतापर्यंत सुमारे ५००० वृक्षांचे रोपण व संगोपन केले आहे. वृक्षारोपणाबरोबरच लहान मुलांमध्ये पर्यावरणाबद्दल जागृती निर्माण व्हावी म्हणून यावर्षी संस्कार, योगदर्शन, आयुर्वेदा दर्शन या विषयांवर विविध शाळा तसेच महाविद्यालयात सुमारे ४० व्याख्याने दिलेली आहेत. संस्था करीत असलेले हे कार्य वाखणण्यासारखे असून अनुकरणीय असेच आहे.

हरियाली लोक कल्याण सेवा समितीच्या पुढील विधायक कार्यास व प्रकाशित करण्यात येणाऱ्या स्मरणिकेस मुंबईची महापौर ह्या नात्याने माझ्या हार्दिक शुभेच्छा.

**डॉ. शुभा राऊळ**

प्रति :- मा. श्री. मा. ना. कदम साहेब,

संस्थापकीय अध्यक्ष,

हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा.




# सिडको

शहरांचे शिल्पकार

**शहर व औद्योगिक विकास महामंडळ**

**महाराष्ट्र, मर्यादित**

नोंदणीकृत कार्यालय :

निर्मल, दुसरा मजला, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २२०२ २६९० / ६६५० ०१०२ फॅक्स : २२०२ २५०९

E-mail : chairman@cidcoindia.com


दि. २०-१२-२००७

## शुभ संदेश


हरियाली लोक कल्याण सेवा समितीचा तिसरा वर्धापन दिवस ता. ६ जानेवारी २००८ रोजी संपन्न होणार आहे हे जाणून विशेष आनंद झाला. पडिक जमिनीमधून हरियालीची निर्मिती करणे आणि तीही ८० टक्के श्रमदानाच्या माध्यमातून हे कार्य स्पृहणीय आहे. पर्यावरणाचा समतोल आपल्या संस्थेमार्फत राखला जाण्यास मदतच होणार आहे.

आपल्या संस्थेचे कार्य उत्तरोत्तर असेच प्रकर्षाने चालत रहावे ही सदिच्छा.!

आपला स्नेहांकित

(नकुल पाटील)

प्रति :- मा. श्री. मा. ना. कदम साहेब,
संस्थापकीय अध्यक्ष,
हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा.



विलासराव देशमुख

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दूरध्वनी : २२०२५१५१ / २२०२५२२२

फॅक्स: २२०२९२१४

# मुख्य मंत्री

महाराष्ट्र

दि. २६-१२-२००७

## शुभ संदेश


हरियाली लोक कल्याण सेवा समितीचा तिसरा वर्धापनदिन येत्या ६ जानेवारी रोजी साजरा करण्यात येत असून त्यानिमित्त निसर्गप्रेम नावाच्या दुसऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन होत असल्याचे समजून आनंद वाटला.

या समितीमार्फत नवी मुंबई परिसरात वृक्षारोपण आणि पर्यावरण संतुलन या क्षेत्रात मोलाचे कार्य करण्यात येत आहे. वृक्ष हा केंद्रबिंदु मानून शांतता, पर्यावरण संतुलन, रोजगार निर्मिती, अर्थिक भरभराट, सामाजिक आरोग्य आणि श्रमदानातून स्वच्छता अशा विविध बाबतीत कार्य करण्याचे संस्थेचे उद्देश प्रशंसनीय आहे. लोकांमध्ये जागृती निर्माण करून त्या व्दारे विभागाचा कायापालट करण्याचा संस्थेचा उपक्रम कौतुकास्पद आहे. पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने मार्गदर्शन करणारे लेख निसर्गप्रेम या स्मरणिकेत समाविष्ट केले जातील अशी मला आशा वाटते.

नियोजित समारंभास माझ्या हार्दिक शुभेच्छा.!

(विलासराव देशमुख)

प्रति :- मा. श्री. मा. ना. कदम साहेब,
संस्थापकीय अध्यक्ष,
हरियाली लोक कल्याण सेवा समिती, सानपाडा.



# *Global Warming Control A Simple Way*

**Dr. K. C. Tripathi.**
(The author is a Swedish Philosophic Doctor)

There is a stretch of forest area near Sanpada Railway Station near Railway Tracks and by the side of road. It is increasing day by day. One can enjoy morning or evening walks in clean air rich in oxygen. Every morning one can see, Mr. M. N. Kadam along with a team of five or six persons of Hariyali Lok Kalyan Seva samiti of Sanpada, Navi Mumbai; working hard, planting, watering, maintaining the garden area.

About eight years back this was derelict and barren land. Mr. Kadam's efforts to bring together like minded people for such development and tackling social problem is praiseworthy.

Plantation of trees and there maintenance does solve world-wide social problem if more and more people get interested and work for it.

We know how Global Warming is melting polar ice, and ice in Himalayan mountains and other mountains of the world. This causes imbalance in earth plates. Recent scientific studies indicate that such imbalances may even cause earth quakes and volcano eruptions. Apart from this we have been reading about other effects of Global Warming such as climate change, increase in number and extent of devastation by cyclones, hurricanes, tornadoes etc.

Main cause of Global Warming is excessive production of carbon-di-oxide, by thermal power plants, transport systems, factories and even all living beings. The simplest and easiest way to control the content of carbon-dioxide in atmosphere is to grow more trees which consume it by photo-synthesis.

I feel that all Governments should take the Global Warming problem seriously and simultaneously encourage such selfless, honest and devoted people where ever they are. This will definitely quicken the solution of this kind of world - wide problem. Even all deserts of the world can easily be cultivated, thus reduce the carbon-di-oxide content in atmosphere to a considerable extent.

## What is Global warming?

*Global warming is an increase in the earth's average temperature, caused by the burning of fossil fuels and industrial pollutants. Look closer, and it becomes clear that global warming is, in reality, the outcomes of the lifestyle choices made by human beings. Simply put, as the human dependence on resources such as coal, oil and gas increase, so dose the amount of carbon emitted, thereby increasing the concentration of greenhouse gases (mostly carbon-di-oxide) in the earth's atmosphere. These greenhouse gases have the ability to 'trap' heat in the lower atmosphere, causing an increase in the earth's average temperature.*

*Complied by : M.N.Kadam*



Environmentalists have long been fond of staying that the sun is the only safe nuclear reactor, situated, as it is sortie ninety-three milling miles away.



# Save the Environment

The earth is a very beautiful place,
But it is being destroyed at a fast pace.
It is high time we save nature,
As animals too are god's creatures.
Humans can't have their own way,
Even animals have a right to stay.
Try your best to save the forest,
Even though it is a difficult test.
Without flowers on the trees,
How will the next generation
see the breeze?
Can you bear the acid rain ?
Which gives you so much pain.
Oh ! the rubbish thrown everyday,
These will make our children pay.
The dirty grey smoke is creeping in,
And harming our health from deep within;
See! the devastating soil erosion,
Which is increasing due to deforest ration.
Stop the increasing pollution,
That is destroying nation after nation.
so, come and give a helping hand
To make the earth a beautiful land.
Let's save this charming environment,
Before the world comes to an end.

**- Shreeya Tippanwar**
Std. VIth
Ryan International School, Sanpada.

## Save Energy, Save Environment
## Some Tips

- *Switch off lights when you aren't using them.*
- *Turn down the geyser thermostat to 50°C.*
- *Use energy-saving settings on air conditioners, washing machines, dishwashers and refrigerators.*
- *Don't waste water, inside or outside your home.*
- *Clean your refrigerator's condenser coils once a year.*
- *Air-dry your clothes as much as possible. It will cost you nothing.*
- *Repair leaky Tabs and toilets (five per cent of water use is leakage).*
- *Open drapes and windows during sunny summer days and after sunset in the winter.*
- *Run washing machines, microwaves and other electrical appliances outside of peak hours,*
- *Install a water-saving showerhead.*
- *Install water-efficient faucet heads for your kitchen and bathroom sinks.*
- *Install a programmable thermostat for your AC.*
- *Clean or change the air filter on ACs in the summer.*
- *Install a geyser wrap.*
- *Insulate the exposed sections of hot and cold water pipes.*
- *Replace ordinary incandescent bulbs with compact fluorescent light (CFL) bulbs.*



# *The Path of Victory*

M. Biwas


Around four and a half years back, I shifted to Sanpada, Sector-2. It takes five minutes from my residence to reach the railway station. But initially, I used to find it difficult to walk from my residence to the railway station and way back everyday due to lack of proper road facilities.

One morning, I noticed a “sign board” on my way to office. It read “Hariyalli Lok Kalyan Seva Samiti” (HLKSS). I didn’t have much idea about the HLKSS till I saw a group of elderly people working on the barren land adjacent to the railway track. They started a plantation drive, where saplings were planted on both sides of the road beyond the pavement. The team is leaded by Mr. Kadam. In my opinion, plantation is perhaps not a very tough job but I feel taking care of the same with proper attention is the tough thing to do. Initially, HKLSS didn’t have money to buy plants and didn’t have any proper source for watering the plants. However, sincerity, dedication and determination of those group members led them to the path of victory. After four years, I really like to congratulate HLKSS and the team members for their success.

HLKSS slowly grew up. All the near by people, became aware of HLKSS. The plants started growing due to the sincere care by HLKSS team. I used to see Mr. Kadam and his team taking care of the plants / lands everyday without fail. He along with other team members used to water the plant or change the soil or remove the unwanted grass to keep the garden clean everyday. All of us, who go to office every morning by this path, feel nice and proud of HLKSS.

Two years down the line, we also found that the road leading to my home from the station was developed. This was made possible with the help of all the local societies near by along with HLKSS. People now prefer this road for morning walk. The road, the garden / plantation look beautiful!! People enjoy their morning walk on this road because of the green belt adjacent to the road. I believe contribution of HLKSS is immense in the daily life of all the people of Sanpada.

We are a developing country and due to the need for industrialization and other infra-structure facilities the environment is being destroyed to a great extent. For our country to prosper, we need to have this development, but we must remember that we also need to do something to maintain the ecological balance. I like the initiatives taken up by HLKSS. It gives the message to the society about the importance of plantation for our existence. More such organizations should crop up and more people should contribute to help in the working of such samitis for saving the environment and beautifying the surroundings for better living and better life.



# Global Warming & Carbon Credits: in Indian Context

P. Susheelkumar S
Asst. Regional Director
NIILM School of Business

Global warming is being discussed at various forums today. "Yesterdays negligence is the cause of todays discussion. And todays remedial measures can only save tomorrow

otherwise its going to be a dooms-day the day after." The developed countries never payed any heed to the wild ways with Green House Gas emissions in the past. Kyoto Protocol is the result of todays discussion which limits the greenhouse gas emissions relative to the levels emitted in 1990s or compels the defaulter to pay a price for crossing the limit.

The developed countries have to either cut down on the GHG-emission or pay a price. Since the developing countries can start with cleaner technologies, as per the protocol they will be rewarded by those stuck with dirty ones. i.e. this allows the industries in developed countries to off-set their emission of CO2 or other related gases by investing in reforestation & Clean energy projects in developing countries. According to reports it is estimated that planting 100,000 hectares of new forests can remove one million tones of Carbon from the atmosphere. For Example, according to reports , in the Handia Forest range of Madya Pradesh, 95 very poor rural villages would jointly earn at least US$300,000 every year from carbon payment by restoring 10,000 hectares of degraded community forest, if their project succeeds. Many such community projects" can sell carbon credits at the Global Market price. Therefore the NGOs like Hariyali Lok Kalyan Seva Samiti can act as intermediaries to combine the carbon offsets produced by communities and sell them jointly to buyers & benefit the common people both economically and simultaneously reducing the GHG-emission effect.

Views/eicbressed bvf.

## What is carbon credit?

Carbon credits are a concept that finds its origins in the kyoto protocol. Under its terms, limits are imposed on countries in terms of the green house gas emissions it can generate. In turn, countries impose limit on businesses. If a company then exceeds the cap, it will have to by carbon credit from companies in countries that have managed to reduce emissions and stay below the prescribed norms.


*Complied by : M.N.Kadam*

## What are greenhouse gases (GHGs)?

**Greenhouse gases (GHGs) are six gases listed in the Kyoto Protocol:**

Carbon dioxide (CO2), Methane ($CH_4$), Nitrous oxide (N2O), Hydroflurocarbons (HFCs), Perflurocarbons (PFCs), Sulphur hexafluoride ($SF_6$), which trap the sun's energy contributing to rising surface temperatures (global warming).

*Complied by : M.N.Kadam*



# संपादकीय ✍

**मा. ना. कदम**

**"निसर्ग प्रेम"** नावाची दुसरी स्मरणिका लोकांचे हाती देताना अत्यंत व वेगळाच आनंद होत आहे. हे काम करत असताना अनेक बरे-वाईट अनुभव आले. अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागले. परंतु हरियाली लोक कल्याण सेवा समितीच्या (HLKSS) पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी हिंमत न हारता काम चालू ठेवले. काम अपेक्षेपेक्षा अधिक चांगले झाले आहे म्हणूनच निसर्गप्रेमाचा हा सुटसुटीत झरा आपल्याकडे सोपवताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाधानाची लकेर झळकली आहे.

मुखपृष्ठ हा दरवर्षी सर्वासमोर असलेला व वर्षभर एक चर्चेचा विषयच असतो. अनेक लोकांच्या कल्पना, विचार घेऊन त्याला शेवटची झळाळी देण्यास "अनुपम आर्टस" चा मोलाचा हातभार लागला आहे.

HLKSS ही आपल्या उदिष्टाच्या पूर्तीसाठी सतत कार्यरत आहे, म्हणूनच सानपाड्यातील व इतर अनेक ठिकाणी स्थानिक पर्यावरणामध्ये सुधारणा झाली आहे. यासाठी असंख्य लोकांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे हातभार लागला आहे. निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वृक्षारोपण, वृक्ष संवर्धन रॅली आणि श्रमदानातून स्वच्छता व शाळांमध्ये व्याख्याने या माध्यमातून समाज प्रभोधनाचे कार्य अखंड चालू आहे.

सानपाड्यातील नागरिकांनाच नव्हे तर सर्व ठिकाणच्या जनतेला ही स्मरणिका मार्गदर्शक ठरेल व सतत पर्यावण संवर्धन राखण्यासाठी प्रेरणा देत राहील. याबद्दल आम्ही आशावादी आहोत.

संस्थेच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त सर्व सभासदांना हार्दीक शुभेच्छा.!

# Pollution Control Tips

## FOR PUBLIC WELFARE


**Why this?** | **Try this !**



Don't cut Trees




Conserve Trees




Don't Spit on Road & Public Places



Spit at Suitable Places



Don't us Petrol Bike



Use Bicycle




Don't throw Garbage on Road




Put Garbage in Dust Bin



Don't Urinate at Public Places



Use Uriner




Don't Use for Single person



Use Public Vehicle

Concept- M.N. Kadam



**Ramrao Wagh**
Commissioner of Police,
Navi Mumbai.

# MESSAGE

**Date : 24-12-2007**

**I** am glad to know that "Hariyali Lok Kalyan Seva Samittee" a social organization is working since eight years in Navi Mumbai area in the fields of tree plantation, employment, public health etc. and is going to publish its second souvenir **"Neesarga Prem"** on 06/01/2008.

It is admirable that during the last eight years about 5000 trees have been planted by the organization in Sanpada and surrounding areas. Tree plantation is very important factor in environment protection and in keeping atmosphere pollution free.

I wish all the best for Shri M. N. Kadam Founder Chairman of the organization and his colleagues who are helping him in performing above social work.

**To,**
Shri M. N. Kadam,
Chairman,
Hariyali Lok Kalyan Seva Samittee.
409. Nilkanth Corner. Sector 2.
Sanpada, Navi Mumbai - 400705.



मंत्री

**मंत्री**

**वने**

महाराष्ट्र शासन

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २६-१२-२००७

**संदेश**

हरियाली लोकल्याण सेवा समितीव्दारे मागील नऊ वर्षापासून विविध सामाजिक कार्य उदा. श्रमदानातून स्वच्छता, पर्यावरणाचे संतुलन, सामाजिक आरोग्य, रोजगार निर्मिती व शांतता हे आंतरराष्ट्रिय प्रश्न विचारात घेवून काम करित आहे. हे वाचून आनंद झाला.


संस्थेने महाराष्ट्राभर वनीकरण, जनजागृती व पर्यावरणाचे संतुलन राखण्याचे सामाजिक कार्य करण्याचे उद्देश डाळ्यापुढे ठेवणे ही गौरवास्पद बाब आहे. संस्थेद्वारे विविध होणाऱ्या सामाजिक कार्यास व त्यानिमित्ताने प्रकाशित होणाऱ्या **" निसर्ग प्रेम स्मरणिका-२००८"** ला माझ्या हार्दिक शुभेच्छा.

(बबनराव पाचपुते)

मा. श्री. मा. ना. कदम

संस्थापकिय अध्यक्ष,

हरियाली लोकल्याण सेवा समिती, नवी मुंबई.



# नवी मुंबईचे अस्वास्थ्य..... माझा पर्याय.........

श्री. मा. ना. कदम
४०६, प्रिती पार्क,
सेक्टर- २, सानपाडा,
नवी मुंबई- ४००७०५

**स्वच्छतेला लोकजागृती हाच पर्याय !**

सामाजिक आरोग्य व वैयक्तिक स्वास्थ्य हे मुख्यतः स्वच्छतेवर अवलंबून असते. स्वच्छता व पर्यावरण याबद्दल आपण बरेच बोलत असतो. परंतु बोलणाराच नेमका चुकत असतो, हाच मुख्य अडथळा आहे. लोका सांगे ब्रम्हज्ञान आपण मात्र कोरडा पाषाण असे म्हटले तर वावगे होणार नाही. आपल्या मनाची धारणा, ठेवण यासाठी बदलणे फारच गरजेचे आहे. कारण बऱ्याच गोष्टी आपल्याला समजतात परंतु आपण त्या आचरणात आणत नाही. आपले शरीर स्वच्छ असून चालत नाही. कपडेही स्वच्छ असून चालत नाही, तर, परीसरही स्वच्छ असावा लागतो. हे शहरामधील सुशिक्षित नागरीकाला समजत नाही असे नाही. सर्व समजते परंतु आचरणात आणले जात नाही हाच खरा अडथळा आहे. रोग होण्यापूर्वी आपण प्रतिबंधात्मक उपाय करत नाही हेच खरे दुःख आहे. यावर मला असे सुचवावेसे वाटते की.....

१) जर प्रत्येक नागरीकाने घर ते ऑफिस व ऑफिस ते घर प्रवास करत असताना जो कचरा आपण वेगवेगळ्या रुपाने निर्माण करतो. उदा. गुटका पाऊच, सिगारेट पाकिट, मॅचबॉक्स, चॉकलेट पेपर, बिस्टिक पेपर, फास्ट फुड पेपर इ. (ही यादी फारच मोठी होईल). हा निर्माण होणारा कचरा ज्याप्रमाणे आपण आपल्या अमुल्य वस्तु सांभळतो, तशा पध्दतीने कचरा सांभाळून ठेवला व योग्य ठिकाणी त्याची विल्हेवाट लावली तर स्वच्छतेचे ५० % काम नागरिकांच्या सहकार्याने होईल. येता जाता निर्माण होणारा कचरा वाटेत टाकायचा नाही तर तो जवळच जपून ठेवायचा व कचऱ्याच्या पेटीतच टाकायचा, बाकी पुढील काम महानगरपालीका करेल. रस्त्यावरील कचरा हा मानवनिर्मित असून तो मानवाने थोडेसे लक्ष देऊन अतिरिक्त वेळ न देता वरील प्रमाणे स्वच्छतेचा मंत्र घेता येईल.

२) पाळीव प्राणी पाळणाऱ्या प्रत्येक नागरिकाने कागदी पिशवी घेऊनच कुत्र्यासारख्या प्राण्याला फिरायला बाहेर काढायचे व जर त्याने विष्ठा रस्त्यावर केली तर ती स्वतः उचलून योग्य ठिकाणी टाकणे हे आद्य आदर्श व सुज्ञ नागरिकाचे कर्तव्य ठरते.

३) प्रतिष्ठीत व्यक्ति की ज्या सामाजिक व राजकिय क्षेत्रात आपला ठसा उमटवून एक अढळ स्थान निर्माण केले आहे, अशांनी जर आठवड्यातून एकदा रस्त्यावर स्वच्छता अभियान राबविले तर नक्किच त्याला प्रतिसाद मिळून खूप मोठे सामाजिक काम केल्याचे समाधान मिळेल व सामाजिक आरोग्याला हातभार लागेल. मला काय त्याचे, मला काय त्याचे ही भूमिका घेतली व महानगरपालिकेला

काहीच भरीव काम होणार नाही.

४) नगरसेवक यासारखे लोकप्रतिनिधी यांनी आपल्या वॉर्डमध्ये जसे मताला फिरतात तसे महिन्यातून त्यानी स्वत: किंवा त्यांचे प्रतिनिधी याने प्रमाणिकपणे फेरी मारून आढावा घ्यावा व त्याचा रिपोर्ट महानगरपालिकेला करून, त्याचा पाठपुरवठा करावा. मग ते काम वृक्षारोपण व संवर्धनाचे, स्वच्छतेचे किंवा विकासाचे असो त्यावर नजर ठेवणे हे त्याचे आद्य कर्तव्य ठरते. यातून नक्किच परिसराचा कायापालट होईल याबद्दल मला खात्री आहे.

५) या अभियानामध्ये शाळेतील मुलांना सहभागी करून घेणे हे विकसनशिल देशातील प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे.

स्वच्छतेबद्दल मुलांमध्ये जागृती निर्माण करून त्याचे मार्फत नागरीकांना, सुसंस्कृतपणाचा संदेश पोहचविला तर फार मोठ्या प्रमाणात काम होईल.

६) कितीतरी लोक घरातील कचरा खिडकीतून बाहेर टाकतात. झोपडपट्टीमध्ये व चाळीमध्ये आपल्या घरासमोरचा कचरा दुसऱ्याच्या घरासमोर सारला जातो व यातुनच दिवसाची सुरवात भांडणाने होते नव्हे तर अस्वच्छतेबरोबर प्रदुषणाला सुरवात होते. यासाठी त्याच चाळीतील सुज्ञ लोकांनी इतर लोकांना जागृत करणे जरूरीचे आहे व वेळ मिळेल तेंव्हा नेतृत्व असलेल्या लोकांनी झाडू घेऊन स्वत: सुरूवात केली तर बराच फरक पडेल उदा. शाळेतील प्राचार्य स्वच्छतेसाठी उभे राहिले तर सर्व विद्यार्थी धावत येतील व फार मोठे काम होईल. गरज आहे ती इच्छाशक्तिची व चांगल्या नेतृत्वाची.

वरील मुद्यांच्या अंमलबजावणीने स्वच्छ, प्रसन्न, निरोगी व संपन्न नवी मुंबईचे स्वप्न नक्कीच साकार झाल्याशिवाय राहणार नाही. गरज आहे ती प्रत्येकाने आपल्या घरापासून या कामाला सुरवात करण्याची, बाकी काम महानगरपालिका सांभाळेल

# पर्यावरणाची व्याप्ती

पर्यावरणाला दिशा व सिमा नसते. माणसाने सोडलेला श्वासही सर्व विश्वामध्ये प्रवास करत असतो. याचे उदाहरण म्हणजे इराक व अमेरिकेमधील युध्द. अमेरिकेने इराकवर बाँब टाकले, तेलाच्या विहिरी जळाल्या व त्यातून धुराचे लोट च्या लोट बाहेर पडून सर्व जगभर प्रवास करत हा ढगरूपी धूर अडविण्याचे काम हिमालयाने केले. तेथे नेपाळ या देशामध्ये काळा पाऊस व काळा बर्फ पडला. त्यामुळे सर्व नेपाळ विदृप व प्रदुषीत झाला. येथे लक्षात ठेवण्यासारखे म्हणजे बाँब टाकला अमेरिकेने, युध्दभूमि इराक व परिणाम भोगावे लागले नेपाळला. विद्रुप नेपाळला भरपाई देण्यासाठी जगातील सर्व पर्यावरणवाद्यांनी अमेरिकेने नेपाळला भरपाई द्यावी अशी जोरदार मागणी केली. यावरून पर्यावरण ही बाब वैयक्तिक नसून तो एक सामाजिक व जागतिक प्रश्न आहे. यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग महत्वाचा आहे. तरच मानव जात अबाधित राहील.

# Have a Little Knowledge

Running a tap can use

**10-14 litres**

of water a minute - enough for a small bath in just 5 minutes

One drip per second wastes

**1,200 litres**

of water

in a year. That's around 4 litres in a day; and 90 litres of water if the drips are breaking into a stream

In the last 50 years

**70%**

of India's inland water has been

**contaminated**

due to industrial sewage pollution

## *Important tips regarding plants*

*I quote some statistics from an article about trees which should interest tree lovers.*

*A 50 year old tree in its life time*

*i) Yields timber worth Rs. 50,000*

*ii) Oxygen worth Rs. 12.40 lakhs.*

*iii) Air pollution reduction worth Rs. 24.80 lakhs.*

*iv) Erosion control worth Rs 12.40 lakhs.*

*v) In recycling value Rs. 14.80 lakhs*

*And this does not include sustaining various creatures, pest control, temperature reduction, fruits and flowers. The above facts should be an addition incentive for us to show more respect to trees and their preservation.*

*- compiled by*
*M. N. Kadam*

## *Carbon Footprint*

Carbon footprint is a measure of the impact human activities have on the environment in terms of the amount of greenhouse gases produced , measured in units of carbon dioxide.

A few quick ways to reduce your personal carbon footprint : employ eco-friendly methods of travel, eat environmentally friendly diets ( vegetables, fruits are better than meat ), minimise use of plastic products and save electricity & water as much as you can.

## जलसंधारण महत्वाचा मुद्दा

आपण शहरामध्ये वृक्षारोपणाला खूप महत्व देतो. या बरोबरच आपण हे लक्षात ठेवले पाहीजे की डोंगरदऱ्या वृक्षानी भरल्या पाहीजेत, तरच पाण्याची जमिनीतील पातळी वाढेल. डोंगरदऱ्या वृक्षानी भरल्यास पाणी पावसाळ्यात पावसाचे रुपाने, हिवाळ्यात झऱ्याच्या रुपाने व उन्हाळ्यात विहिरीच्या रुपाने मुबलक मिळते हा साधा मंत्र आहे. तसेच निसर्ग व प्राणी यांचा चांगला परस्पर संबंध जोडला जातो. वन्य प्राण्यांचे चांगले रक्षण होते. आपण निसर्गाच्या संपत्तीवरच जगतो. यावरुन आपण वृक्षाला महत्व देऊन जागा मिळेल तेथे वृक्ष लावून त्याचे संवर्धन केले पाहीजे. यातच मानव जातीचे व भावी पिढ्यांचे कल्याण आहे. नव्हे तर अस्तित्व अवलंबून आहे.

-मा.ना.कदम



राईचे तेल व मिठ दाताला लावल्यास हिरड्या व दात मजबुत होतात.

# नवी मुंबई महानगरपालीका शाळेच्या चित्र स्पर्धेतील पारितोषीक विजेते


साहील शेख
६ अ, शाळा क्र.२५


फरजाना अन्सारी
४ अ, शाळा क्र.२


रेश्मा वल्ली
६ अ, शाळा क्र.१६


गोपाल राठोड
४ अ, शाळा क्र.१८



सोनाली शिवशरण
६ अ, शाळा क्र.१


रेखा प्रजापती
६ ब, शाळा क्र.१९


जरीना शेख
७ ब, शाळा क्र.६


ज्योती मालपुरे
६ क, शाळा क्र.२३